KOKAN UDYOJAK PRATISHTHAN

# कोकण उद्योजक प्रतिष्ठान रजि. क्र.: ई-२९१११ (एम)

# समृध्द कोकण

समृध्द कोकण

११५, मिठा चेंबर (सत्यगिरी) २, भरतक्षेत्रच्या समोर, दादासाहेब फाळके रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४
संपर्क : ८८५०८०७२२७ / ०२२-२४१५५४१२
वेबसाईट : www.kokanclub.org / ई-मेल : infokokanclub@gmail.com

फोटो

## कोकण दूत - सभासदत्वासाठी अर्ज वैयक्तिक

अनुक्रमांक

पावती क्रमांक

तारीख :____________________

१. नाव : ____________________

२. घरचा पत्ता : ____________________

____________________

३. व्यवसायाचे स्वरुप - संस्था/व्यक्तिगत/भागिदारी: ____________________

४. नोकरी /व्यवसायाचा पत्ता : ____________________

____________________ मोबाईल : ____________________

५. जन्म तारीख : ____________________

६. ईमेल : ____________________ वेबसाईट : ____________________

७. गावचा पत्ता : ____________________

८. गावातील प्रकल्पाचा पत्ता : ____________________

## कोकण दूत

कोकणातील व्यवसाय / प्रकल्प असल्यास याची माहिती : ❑ पाणी ❑पर्यटन / कृषी पर्यटन ❑प्रगत शेती

❑फलोद्यान ❑प्रक्रिया ❑मत्स्योद्योग ❑प्रशिक्षण ❑इतर ____________________

कोकणातील व्यवसायाच्या भविष्यातील योजना व आवडता विषय : ____________________

____________________

समृध्द कोकणमध्ये कार्यकर्ता म्हणून सहभागी व्हायला आवडेल का? : होय / नाही

कोकणातील सामाजिक कार्यात सहभाग असल्यास संस्थेचे नाव व पद : ____________________

संस्थेचे कामाचे स्वरुप : ____________________

## कोकण मत्स्योद्योग

**व्यवसायाचे स्वरुप / प्रकल्प :** ❑ पारंपारिक मच्छिमारी ❑ गोड्या पाण्यातील प्रकल्प ❑ निमखाऱ्या पाण्यातील प्रकल्प

❑ कोळंबी प्रकल्प ❑ मत्स्यप्रक्रिया ❑ शोभिवंत मासेपालन ❑ खेकडा प्रकल्प ❑ केज कल्चर ❑ इतर ____________

**प्रकल्पाचे नाव व पत्ता :** ____________

**व्यवसायाच्या भविष्यातील योजना :** ____________

**कोकणातील मच्छिमार संघटना / संस्था यामध्ये सहभाग असल्यास संस्थेचे नाव :** ____________

**संघटनेचे / संस्थेचे कामाचे स्वरुप :** ____________

## कोकण कृषी उत्पादक व फळप्रक्रिया उद्योग

**व्यवसायाचे स्वरुप / प्रकल्प :** ❑ आंबा ❑काजू ❑फळशेती ❑वनशेती ❑अन्य फळांवरील प्रक्रिया ❑मसाला पिके

❑आधुनिक शेती ❑भाजीपाला ❑सामुदायिक शेती ❑इतर ____________

**प्रकल्पाचे नाव व पत्ता :** ____________

**व्यवसायाच्या भविष्यातील योजना :** ____________

**कोकणातील कृषी उत्पादक संघटना / संस्था यामध्ये सहभाग असल्यास संस्थेचे नाव :** ____________

**संघटनेचे / संस्थेचे कामाचे स्वरुप :** ____________

---

प्रति,

अध्यक्ष

कोकण उद्योजक प्रतिष्ठान - समृध्द कोकण

स. न. वि. वि

मी ‘कोकण दूत (कार्यकर्ता)’ या उपक्रमाचे सदस्य होऊ इच्छितो /इच्छिते. मी ‘ कोकण दूत ’ चे नियम संपूर्णपणे वाचले आहेत. ते मला मान्य आहेत.

मी समृध्द कोकणच्या अभियानात स्वेच्छेने सहभागी होत आहे. या संस्थेच्या कोकण विकासाच्या उपक्रमांसाठी व समृध्द कोकण अभियानासाठी दरवर्षी रु. १०००/- किंवा त्यापेक्षा जास्त निधी देण्याचे मान्य करीत आहे. कृपया मला सहभागी करुन घ्यावे.

**अर्जदाराची सही**

सहभागी सभासदाचा अर्ज निवड समितीने मान्य केला आहे.

| | | |
|---|---|---|
| **तालुका कार्याध्यक्ष सही** | **जिल्हा कार्याध्यक्ष सही** | **निवड समिती संचालक सही** |

**सभासद प्रवेश फी - रु.१००/- व वार्षिक सह्योग निधी किमान रु. १०००/- किंवा अधिक रु..................................**

**धनादेश क्र. :** ____________

**बँकेचे नाव :** ____________

**टीप :- धनादेश - कोकण उद्योजक प्रतिष्ठान / Kokan Udyojak Pratishthan या नावाने काढावेत.**

प्रति,

अध्यक्ष

कोकण उद्योजक प्रतिष्ठान - समृध्द कोकण

स. न. वि. वि

मी 'कोकण दूत (कार्यकर्ता)' या उपक्रमाचे सदस्य होऊ इच्छितो /इच्छिते. मी ' कोकण दूत ' चे नियम संपूर्णपणे वाचले आहेत. ते मला मान्य आहेत.

मी समृध्द कोकणच्या अभियानात स्वेच्छेने सहभागी होत आहे. या संस्थेच्या कोकण विकासाच्या उपक्रमांसाठी व समृध्द कोकण अभियानासाठी दरवर्षी रु. १०००/- किंवा त्यापेक्षा जास्त निधी देण्याचे मान्य करीत आहे. कृपया मला सहभागी करुन घ्यावे.

| तालुका कार्याध्यक्ष सही | जिल्हा कार्याध्यक्ष सही | निवड समिती संचालक सही |
|---|---|---|

## समृध्द कोकणची मूलतत्वे व सहभागी कोकण दूत (सदस्यांसाठी) आचारसंहिता

१. समृध्द कोकण हा कोकण उद्योजक प्रतिष्ठान या संस्थेचा उपक्रम आहे. समृध्द कोकण हे कोकणवासीय व्यवसायिक व उद्योजक यांना एकमेकांच्या उत्कर्षासाठी सकारात्मक विचार-विनिमय व ठोस कृतींकरीता एकत्र आणण्याच्या दृष्टीने निर्माण केलेले व्यासपीठ आहे. या व्यासपीठाद्वारे मिळणाऱ्या सेवा-सुविधांचा उपयोग कोकण दूत यांना (सहभागी सदस्यांना) त्यांच्या उद्यम-व्यवसायाच्या विकासासाठी व्हावा व विकासातून सर्वसामान्यांसाठी रोजगार-तथा-उपजीविकेच्या साधनांची निर्मिती व्हावी, हे स्थापनेमागील मूळ उद्दिष्ट आहे.

२. समृध्द कोकणच्या उपक्रमामधील सहभागी कोकण दूतने (सदस्याने) कोकणात आपली जमीन असल्यास ती शक्यतो न विकता तिचा वापर आर्थिकदृष्ट्या अधिकाधिक उत्पादक पद्धतीने म्हणजेच कोणत्यातरी उद्यम-व्यवसायाच्या उभारणीसाठी कसा करता येईल याचा सतत मागोवा घ्यावा. जमीन विकण्याची वेळ दुर्दैवाने आलीच तर ती शक्यतो अन्य कोकणवासीयालाच विकावी.

३. सर्वसाधारणपणे दरमहा होणाऱ्या बैठक/परिषद कार्यक्रमात सहभागी होऊन आपले ज्ञान व अनुभव यांचा लाभ प्रत्येक सहभागी कोकण दूतने इतर कोकण दूत (सहभागी सदस्याना) द्यावा. चर्चा, विचार-विनीमय केवळ सकारात्मक असावे. आपला सध्याचा व भावी उद्यम-व्यवसाय आणि आपण करीत असलेले व्यवहार व कामे यांच्याशी निगडीत बाबी, यांवर चर्चा केंद्रित असावी.

४. समृध्द कोकणच्या मिळणाऱ्या सेवा / सुविधांकरीता / सर्वसाधारणपणे काही ना काही मुल्य सेवाशुल्क असेल. विनामुल्य सेवेची अपेक्षा नसावी.

५. प्रशिक्षण व अन्य कार्यक्रमांसाठी कोकण दूत सदस्यांसाठी काही विशेष सवलती असतील.

६. कोकण दूत यांनी एकमेकांना व्यावसायीक पध्दतीने मदत करावी व त्याकरीता वाजवी व्यावसायीक सेवाशुल्क आकारावे असे अभिप्रेत आहे. समृध्द कोकणच्या सहभागी सदस्यांनी व्यावसायीक वा आर्थिक फसवणूक वा दुराचार करु नये. अशी बाब आढळून आल्यास अशा सहभागी सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार अनुशासन समितीस राहील.

७. समृध्द कोकणच्या प्रेरणेतून कोकणात विविध प्रकारचे वैयक्तिक प्रकल्प, उद्यम, व्यवसाय स्वतंत्रपणे, वा सहकारी तत्वावर (एकत्रितपणे) उभे राहू शकतील या करीता आवश्यक तो सल्ला-तथा-मार्गदर्शन त्या-त्या विषयांतील तज्ञांकडून उपलब्ध

करुन देण्याचा प्रयत्न राहील. परंतू या प्रकल्प, उद्यम, व्यावसायाच्या आर्थिक व इतर व्यवहाराशी संस्थेचा संबंध मुळीच असणार नाही. या प्रकल्प, उद्यम, व्यवसायाचे यशापयश, आर्थिक फायदा-तोटा साहजिकच त्याच्या एकूण नियोजन व व्यवस्थापनावर अवलंबून राहील.

८. समृध्द कोकणच्या व्यासपीठाशी संलग्न होऊन एकत्र आल्यामुळे मिळणाऱ्या सेवा-सुविधा या सहभागी सदस्यांच्या सकारात्मक व परस्पर सहकार्याच्या भावनेवर आणि कृतीशिलतेवर मुख्यत्वे अवलंबून असल्यामुळे या सेवा-सुविधांकडे आपला अधिकार व हक्क म्हणून सहभागी सदस्यांनी पाहू नये. यात काही वाढ-घट होणे व्यावहारीक व स्वाभाविक आहे.

९. समृध्द कोकण दूतच्या सहभागी (सदस्याला) वा त्याने शिफारस केलेल्या कोणाही व्यक्तीला शासकीय वा इतर कोणत्याही स्त्रोताकडून आर्थिक मदत अनुदान/सबसिडी, कर्ज वा एखादी इतर सवलत/सुट परवाना मंजूरी आदी मिळवून देण्याची जबाबदारी संस्था कदापीही स्विकारणार नाही. मात्र सहभागी सदस्यांनी निदर्शनास आणून दिलेल्या त्यांच्या व्यावसाय/उद्यमाशी संबंधीत सर्वसाधारण (सामान्य) स्वरुपाच्या अडचणी/समस्यांचे निराकरण व्हावे यादृष्टीने व धोरण विषयक बाबींवर योग्य तो निर्णय विनाविलंब व्हावा या उद्देशाने शासनाच्या संबंधीत विभागाकडे वा संबंधीत प्राधिकरणाकडे उचित पातळीवर, समृध्द कोकणच्या माध्यमातून योग्य ती कैफियत व प्रस्ताव मांडून त्यांचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला जाईल.

१०. समृध्द कोकणच्या सौहार्दपूर्ण व पोषक, वातावरण सर्व सहभागी दूतांच्या (सदस्यांच्या) हिताच्या दृष्टीने सदैव असावे. या दृष्टीने नकारात्मक चर्चा, वितंडवाद वैयक्तिक हेवेदावे, गटबाजी आदी अपप्रवृत्तींना अजिबात स्थान नसावे व त्या टाळण्याची खबरदारी व जाणिवपूर्वक प्रयत्न सर्व सहभागी सदस्यांकडून अपेक्षित आहेत. अशा प्रकारच्या अपप्रवृत्ती वा गैरप्रकार दुर्दैवाने आढळून आल्यास संबधीत सहभागी सदस्यांचे सदस्यत्व संबंधीत क्षेत्रिय संघटकाची मते आजमावून रद्द करण्याचा अधिकार अनुशासन समितीस आहे.

११. सहभागी सभासदत्वाचा अर्ज करताना दोन स्टँप साईज फोटो, शुल्क भरणे आवश्यक आहे - नियमित सदस्यांसाठी

१२. सहभागी सभासदत्वाचा अर्ज पूर्णपणे भरलेला असावा.

१३. सहभागी सभासदांमधील अथवा सहभागी सभासदांशी झालेल्या कोणत्याही आर्थिक किंवा इतर व्यवहारांस संस्था किंवा संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

१४. मल्टीलेवल मार्केटिंग (नेटवर्क मार्केटींगशी) संबंधीत असलेल्या सहभागी सदस्यांनी अशा स्वरुपाचा व्यवसाय येथे करु नये. एखाद्या सहभागी सभासदाकडून याबाबत तक्रार आली असता संबंधीत सहभागी सदस्याचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळ राखून ठेवत आहे.

१५. परिषदेच्या वेळी मोबाईल बंद ठेवणे अथवा सायलेंट मोडवर ठेवणे बंधन कारक आहे.

१६. पाहुण्यांनी आपली व्हिजीटींग कार्डस् इतर सहभागी कोकण दूतांना न वाटता सभेच्या ठिकाणी ड्रॉप बॉक्स मध्ये टाकावी.

१७. कोणत्याही व्यक्तीला सहभागी सभासदत्व नाकारण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील.

१८. वरील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सहभागी सभासदांचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील.

१९. नियम-नियमावलीत कोणतेही बदल करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाच्या अधिन राहील.

## कोकण दूतचे कार्य

१. कोकण दूत (कार्यकर्ता) यांनी कमीत कमी १० लोकांना समृध्द कोकणचे मेंबर्स करुन घेणे.

२. समृध्द कोकणच्या वेळोवेळी होणाऱ्या नियोजित बैठकीस उपस्थित रहाणे.

३. समृध्द कोकणची संघटना वाढीसाठी प्रयत्न करणे.